दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २७४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.२९ डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# नवीन वर्षाचे स्वागत साधेपणाने करुन प्रशासनाला सहकार्य करा : रवींद्र दौंडकर

## फार्म हाऊस व रिसॉर्ट यांनी शासन नियमांचे पालन न केल्यास कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील फार्म हाऊस, हॉटेल, रेस्टॉरंट, रिसॉर्ट यांनी शासनाने दिलेल्या नियमांचे पालन करावे अन्यथा कारवाई करू असा इशारा पनवेल तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र दौंडकर यांनी परिसरातील फार्म हाऊस, हॉटेल, रेस्टॉरंट, रिसॉर्ट यांच्या मालक व चालकांच्या एकत्रित बैठकीत दिला.**



या बैठकीमध्ये उपस्थितांना वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र दौंडकर यांनी सूचना केल्या त्यामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव लक्षात घेता ३१ डिसेंबरच्या अनुषंगाने सार्वजनिक करमणुकीचा कार्यक्रम व नियोजन करण्यास किंवा तशी प्रसिद्धी जाहिरात देऊ नये तसेच कोविड १९ व ओमायक्रोन या विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता ३१ डिसेंबर २०२१ व नूतन वर्षाचे स्वागत अत्यंत साधेपणाने करणे अपेक्षित आहेत. आपण आपल्या मालकीच्या ताब्यात असलेल्या जागेत नववर्षाच्या स्व–ागताचे निमित्त आयोजित करत असलेल्या कार्यक्रमाच्या ठिकाणी कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या लोकांचे जीवितास कोणत्याही प्रकारे धोका निर्माण होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी आपण घ्यावी. शासन महसूल व वन विभाग आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभागाकडील दिनांक २४/१२/२०२१ रोजी च्या आदेशान्वये दिलेल्या निर्देशानुसार मा.जिल्हाधिकारी सो, रायगड यांनी रायगड जिल्हा कार्यक्षेत्रात दिनांक २४/१२/२०२१ पासून रात्री २१:०० ते सकाळी ०६:०० वा. पर्यंत बंदी लागू करण्यात आलेली आहे. ३१ डिसेंबर २०२१ या दिवसाचा आनंद लुटण्यासाठी काही लोक आ–पले कुटुंबासह नातेवाईक,मित्रपरिवार,फार्म,फार्म हाऊसवरील स्विमिंग पूलमधील पाण्यात पोहण्यास जातात परंतु पाण्यात पडून,बुडून कोणाच्या जीवितास धोका निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहील. ३१ डिसेंबर २०२१ निमित्त आनंद साजरा करत असताना कोणत्याही प्रकारे जुगार खेळताना अगर दारूचे अथवा ड्रग्स सेवन करताना मिळून आल्यास अथवा डी.जे, लाऊडस्पीकर लावून मोठ्याने गोंगाट करून आजूबाजूच्या लोकांना उपद्रव करीत असताना मिळून आल्यास संबंधितावर व आपणावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. आपण अथवा आपल्या कुटुंबासह नातेवाईक मित्रपरिवार हितचिंतकाकडून ३१ डिसेंबर निमित्त



प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे वरील प्रमाणे शासनाने पारित केलेले आदेशाचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करू नये, जेणेकरून आपलेपासून, दुसर्यास त्रास होऊन सार्वजनिक शांतता धोक्यात येईल. कोणत्याही प्रकारचा मनोरंजनाचा अथवा अन्य कार्यक्रम विनापरवाना करताना मिळून आल्यास अगर सदर कार्यक्रमात अपघात आक्षेपार्ह कृत्य घडल्यास त्यास सर्वस्वी आपणास जबाबदार धरून आपल्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल. कोरोना संसर्गाचा (कोविड १९) चा प्रसार होऊन जनतेच्या आरोग्याची धोका निर्माण होईल असे कृत्य करू नये व शासनाकडून देण्यात आलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव लक्षात घेता कार्यक्रमावेळी शासनाने पारित केलेल्या नियमांचे सोशल डिस्टंसिंग,हॅन्ड सॅनिटायझर, मास्क चा वापर या नियमांचे कार्यक्रमावेळी काटेकोरपणे पालन करणे व जास्त संख्येने नागरिक एकत्र येणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी फार्महाउस मालक आयोजक यांची राहील याची देखील सर्वांनी नोंद घ्यावी. कार पार्किंग ठिकाणी भरपूर प्रकाश व्यवस्था असावी व गाड्यांची तोडफोड ,नासधूस चोऱ्या यास प्रतिबंधक करण्यासाठी जादा सुरक्षा रक्षक नेमावेत. सध्या कोविड १९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता महाराष्ट्र शासन गृह विभाग यांनी ३१ डिसेंबर उत्सवाबाबत जे काही आदेश काढतील त्याचे सर्वांनी तंतोतंत करावे. इत्यादी महत्वाच्या सूचना देण्यात आल्या. सदर बैठकीसाठी फार्म हाऊस,हॉटेल, रेस्टॉरंट, रिसॉर्ट चे चालक, मालक असे उपस्थित होते. तसेच उपस्थितांना सीआरपीसी १४९ च्या नोटिस बजावण्यात आलेल्या आहेत.

# विना मास्क फिरणाऱ्यांवर पालिकेची कठोर कारवाई



**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्यभर ओमायक्रॉन विषाणूंचे रुग्ण वाढत आहेत, तसेच महापालिका क्षेत्रातही कोरोनाचे रुग्ण वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेने 'नो मास्क नो एंट्री' चे धोरण पुन्हा जोमाने सुरू केले आहे.


महापालिका हद्दीतील खारघर, कळंबोली, कामोठे, पनवेल याचाही प्रभागातील बाजारपेठा, मॉल्स, गर्दीची ठिकाणे येथे विनामास्क फिरणाऱ्या नागरीकांना ५०० रूपये दंड आकारण्यात येत आहे. तसेच प्रत्येक विभागात , मॅरेज हॉल्स, बँक्वेट हॉल, सोसायट्या यांच्यावरही पालिकचे लक्ष असणार आहे. ३१ डिसेंबरला नव वर्षानिमित्त कोणतेही कार्यक्रम करण्याआधी महापालिकेची परवानगी घेणे बंधनकारक असणार आहे. याठिकाणी क्षमतेपेक्षा जास्त नागरिक दिसून आल्यास अशा आस्थापनेवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे उपायुक्त सचिन पवार यांनी सांगितले आहे. तसेच प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडे ट्रॅव्हल पास असणे बंधनकारक असणार आहे. पालिका क्षेत्रातील सर्व हॉटेल्समध्ये नववर्षाच्या पार्श्वभूमीवर गर्दी न करण्याचे आदेश देण्यात आले आहे. तसेच त्या हॉटेलमध्ये प्रत्यक्षात किती जागा आहेत व त्यांच्या ५० टक्के किती

> कोरानाच्या ओमायक्रॉन उत्परिवर्तित विषाणूच्या पार्श्वभूमीवर पालिका क्षेत्रात पुन्हा एकदा कडक निर्बंध लागू केले आहेत. विना मास्क फिरणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई सुरू केली असून परिस्थितीचे गांभीर्य ओळखून नागरिकांनी कोरानाच्या नियमांचे पालन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.
>
> **-गणेश देशमुख, आयुक्त पनवेल महानगरपालिका**

जागा भराव्यात, हॉटेलमध्ये येणाऱ्या नागरिकांचे दोन्ही डोस पूर्ण झाले असावे, मास्क वापरणे बंधनकारक असणार आहे.रात्रीची जमावबंदी पालिकेने घोषित केली असल्याने रात्री ९:०० ते सकाळी ६:०० वाजेपर्यंत सार्वजनिक ठिकाणी पाच पेक्षा जास्त नागरिक एकत्र येऊ नयेत अशा सुचनांचे स्टिकर्स हॉटेल्सच्या प्रवेशद्वारावर लावण्यात आले आहेत.या सुचनांचे उल्लंघन हॉटेल धारकांनी केल्यास अशा हॉटेल्सवर पालिकेच्यावतीने दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश प्रभाग अधिकाऱ्यांना देण्यात आले आ–हेत. पालिका क्षेत्रात संध्याकाळी सहा वाजेपर्यंत विनामास्क फिरणाऱ्यांकडून साडे तेवीस हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

# पेणचा गुटखा किंग गुड्डूला पुन्हा अटक ; कोर्टाच्या अवमान प्रकरणी पोलिसांची कारवाई

**दै.रायगड नगरी । पेण**



पेण येथील गुटखा विक्रेता शहजाद सरवरअली शेख उर्फ गुड्डू याला न्यायालयाच्या अवमान प्रकरणी अलिबाग पोलिसांनी रात्रीच्या सुमारास ताब्यात घेऊन त्याला अटक करण्यात आली आहे. जिल्हा न्यायालयाने अटक वॉरंट जारी केल्यानंतर गुटखा किंग गुड्डूला पुन्हा अटक करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील गुटखा किंग म्हणून ओळख असलेल्या पेण येथील गुड्डूला गुटखा विक्री प्रकरणी सप्टेंबर २०१९ मध्ये अलिबाग पोलिसांनी अटक केली होती. या बाबत अलिबाग येथील जिल्हा न्यायालयात सुनावणी सुरु आहे. कोर्टात सुरु असलेल्या सुनावणीला वारंवार गैरहजर राहिल्यामुळे गुटखा किंग गुड्डू विरोधात अलिबाग जिल्हा न्यायालयाने अटक वॉरंट काढले होते. त्यानुसार सोमवारी रात्री अलिबाग पोलिसांनी पेण येथून गुटखा किंग गुड्डूला अटक केली आहे. या प्रकरणी त्याला मंगळवारी न्यायालयासमोर हजर करण्यात आले आहे.

## संक्षिप्त...

### अनिल देशमुखांच्या न्यायालयीन कोठडीत वाढ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या न्यायालयीन कोठडीत १४ दिवसांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे देशमुख यांना १० जानेवारीपर्यंत ऑर्थर रोड कारागृहात मुक्काम करावा लागणार आहे.

माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनी केलेल्या १०० कोटींच्या वसुलीच्या आरोप प्रकरणात ईडीने देशमुख यांच्या विरोधात मनी लाँड्रींगचा गुन्हा नोंदवला होता. याच गुन्ह्यात देशमुखांना अटक करण्यात आली. तर राज्य सरकारने परमबीर यांनी केलेल्या आरोपांच्या चौकशीसाठी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती कैलाश चांदीवाल यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना केली. दुसरीकडे चांदीवाल आयोगासमोरील चौकशी दरम्यान निलंबित पोलीस अधिकारी सचिन वाझे याने अनिल देशमुख यांनी गृहमंत्री असताना कोणतीही आर्थिक मागणी केली नव्हती. तसेच त्यांनी कोणत्याही बारमालकांकडून पैसे घेतले नाहीत, असा जबाब दिला होता. तसेच परमबीर सिंह यांनीदेखील प्रतिज्ञापत्रा व्यतिरिक्त काहीही पुरावे नसल्याचे सांगितले होते. त्यामुळे सोमवारी त्यांची न्यायालयीन कोठडी संपत असल्याने त्यांना जामीन मंजूर होईल याबाबत चर्चा होती. मात्र, तरी देखील त्यांच्या कोठडीत १४ दिवसांची वाढ झाल्याने त्यांच्या अडचणीत भर पडली आहे.

# श्रीवर्धन समुद्र किनारी धोकादायक पॅरासीलिंग पुन्हा कोणाच्या आशीर्वादाने सुरू ; नागरिकांमध्ये चर्चांना उधाण

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

काही महिन्यांपूर्वी श्रीवर्धन समुद्रकिनारी पॅरासिलिंग च्या फेऱ्या सुरू करण्यात आल्या होत्या. सदर पॅरासिलिंग हे कोणत्याही परवानगीशिवाय श्रीवर्धन किनारी सुरू असल्या बाबत नागरीकांमध्ये विविध चर्चांना उधाण आल्याचे पाहायला मिळत आहे. वृत्तपत्रांमध्ये पॅरासिलिंग हे कोणत्याही परवानगीशिवाय सुरू असल्याबाबत बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर सदर पॅरासिलिंग करणाऱ्यांनी श्रीवर्धन मधून पळ काढला होता. परंतु नोव्हेंबर–डिसेंबर महिन्यात पर्यटकांची संख्या या ठिकाणी वाढू लागल्यानंतर पॅरासिलिंग करणारी टीम श्रीवर्धन समुद्रकिनारी पुन्हा एकदा दाखल झाली आहे.

पर्यटकांच्या डोक्यात केवळ एक हेल्मेट घालून सदरची पॅरासिलिंग हे अत्यंत धोकादायक परिस्थितीत सुरू आहे.



पॅरासिलिंग उडवणारा कर्मचारी हा पूर्णपणे प्रशिक्षित आहे किंवा नाही याबाबत सदर टीमकडून कोणतीही माहिती प्राप्त होत नाही. अनेक वेळा पॅरासिलिंग समुद्रकिनारा सोडून समुद्रकिनाऱ्याजवळील भूभागावरुनही उडत असल्याचे पाहायला मिळते. पॅरासिलिंग च्या पॅराशुटला अत्यंत लहान आकाराच्या दोऱ्या लावलेल्या असून जोरदार वारा किंवा त्यात काही अडकल्यास अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अपघात झाल्यानंतर एखादा पर्यटक जायबंदी झाला किंवा त्यामध्ये मृत्युमुखी पडला तर याला जबाबदार कोण असणार आहेत असा प्रश्न देखील आलेल्या पर्यटकांकडून उपस्थित केला जात आहे.

श्रीवर्धन समुद्रकिनारी सुशोभित असा धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्यात आलेला आहे. बंधाऱ्याच्या समुद्राकडील भागांमध्ये मोठमोठे खडक पाण्यापासून संरक्षण होण्यासाठी टाकलेले आहेत. जर पॅरासिलिंगचा अपघात होऊन एखादा पर्यटक या खडकांमध्ये पडला तर तो जगण्याची तिळमात्र देखील शक्यता नाकारता येत नाही. सदरचे पॅरासिलिंग हे रायगड जिल्ह्यातील एका बलाढ्य राजकीय व्यक्तीच्या आशीर्वादाने सुरू

.../२

# कोकणातील आपत्ती निवारणासाठी कायमस्वरुपी योजना राबविणार : ना.विजय वडेट्टीवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**



कोकणातील जनतेला दरवर्षी कोणत्याना कोणत्या संकटाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे या भागात आपत्ती निवारणासाठी कायमस्वरुपी योजना राबविण्यावर भर देणार असल्याचे आपत्ती व्यवस्थापन व मदत पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी सांगितले.

महाड आणि कोकणातील आपत्तीसंदर्भात विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासांत ते बोलत होते. कोकणात नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसान झालेल्यांना भरपाई देण्यात येते आहे. त्याचप्रमाणे शाळा, समाजमंदीर, स्मशानभूमी, पिण्याचे पाणी यासारख्या सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसान दुरुस्तीसाठी ३५ कोटी रुपये देण्यात येत आहेत, अशी माहिती श्री. वडेट्टीवार यांनी दिली.

एका महिन्यात हा निधी संबंधित विभागाकडे दिला जाईल, असे त्यांनी सांगितले. कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून कोकणी माणसाला

.../२

# संपामुळे एसटीचे आतापर्यंत ६०५ कोटींचे नुकसान : ना.अनिल परब

**दै.रायगड नगरी । मुंबई**

एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपामुळे महामंडळाचे ६०५ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, अशी माहिती परिवहन मंत्री अनिल परब यांनी सोमवारी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. एसटी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन अदा करून त्यांची वैद्यकीय देयके निकाली काढण्याबाबत तारांकित प्रश्न भाजपचे रणजितसिंह मोहिते पाटील यांनी विचारला होता. यावेळी झालेल्या चर्चेत शशिकांत शिंदे, परिणय फुके, गोपीचंद पडळकर यांनी उपप्रश्न विचारले.




या प्रश्नांवर परब म्हणाले की, संपामुळे महामंडळाचे ६०५ कोटींचे नुकसान झाले आहे. शिवाय, संपामुळे सामान्य जनता यामुळे वेठीस धरली गेली. कामावर परत येण्याचे वारंवार आवाहन करूनही अनेक कर्मचारी कामावर परतले नाहीत. निलंबनाची कारवाई मागे घेण्याचे आश्वासन देऊनही कामावर परतले नव्हते. त्यामुळे बडतर्फ कामगारांच्या बडतर्फीचा निर्णय ताबडतोब मागे घेता येणार

.../२

# तळ्यामध्ये गांजा बंद, गुटखा विक्री सुरूच

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यात मार्केटमधील गांजा विक्री बंद झाली असली तरी अवैध गुटखा विक्री सुरूच आहे. रोज किमान ५० किलो गुटखा शहरभर व येथून ग्रामीण भागात वितरीत केला जात आहे. पोलीस व अन्न व औषध प्रशासनाच्या वरदहस्तामुळे कष्टकरी कामगारांना व्यसनांच्या जाळ्यात अडकविले जात असून याची तक्रार आता थेट मुख्यमंत्र्यांकडे केली जाणार आहे. गांजा विक्रेतेही बिनधास्तपणे मार्केटमध्ये वास्तव्य करू लागले होते. त्यांच्यावर पोलिसांनी कारवाई केल्यानंतर गांजा विक्री तात्पुरती थांबली आहे, पण गुटखा विक्री मोठ्या प्रमाणात सुरू आहे. मार्केटमध्ये बहुतांश जणांना गुटख्याचे व्यसन लागले आहे. कष्टकरी कामगारांना व्यसनांच्या जाळ्यात अडकविले जात असून त्यांना जादा दराने गुटखा विकला जात आहे. बिनधास्तपणे हा व्यवसाय



सुरू असताना त्यावर कोणीही कारवाई करत नाही. प्रशासनाने अवैध व्यवसाय करणाऱ्यांना पाठीशी घालण्यास सुरवात केली आहे. आतापर्यंत एकाही गुटखा विकणाऱ्या दुकानदारावर कारवाई करण्यात आलेली नाही. अवैध गुटखा विक्री करणाऱ्यांवर पोलीस कारवाई करत नाहीत कारवाई करण्याचे अधिकार अन्न व औषध प्रशासनाची

.../२

# राजभवन आणि राजकारण

हे सरकार आणि हे राज्यपाल जोपर्यंत महाराष्ट्रात आहेत; तोपर्यंत कलह, कुरघोडी, कटकटी होत राहणार. राज्यपाल आणि राज्य सरकार यांच्यातील संघर्षाला दर काही दिवसांनी काही तरी नवे कारण लागते. आता हे कारण विधानसभेच्या नव्या अध्यक्षांच्या निवडीने मिळाले. एक तर, विधानसभेचे अध्यक्ष नाना पटोले यांनी राजीनामा दिल्यानंतर, पर्यायी अध्यक्ष निवडण्यासाठी महाविकास आघाडीने इतका विलंब लावण्याचे कारण नव्हते. आता सरकारला अध्यक्षांची निवडणूक घेण्याची बुद्धी झाली असली, तरी ही निवड सुखासुखी होऊ द्यायची नाही, असे राज्यपालांनी ठरविलेले दिसते. सरकारने राज्यपालांना बाजूला ठेवून अध्यक्षीय निवड केलीच, तर त्यातून घटनात्मक पेचप्रसंग आणि मोठी कज्जेदलाली होऊ शकते. याचे कारण, राज्यपाल हेच राज्याचे घटनात्मक प्रमुख असतात. तसे नसते, तर महाविकास आघाडीच्या तीन प्रमुख नेत्यांनी राज्यपालांना भेटून अध्यक्षीय निवडीचा मनसुबा लेखी कशासाठी कळविला असता? या लेखी निवेदनानंतर सुरू झालेला राज्यपाल आणि सरकार यांच्यातील पत्रसंवाद आता विसंवादाच्या पातळीवर गेला आहे. विधानसभेचे अध्यक्ष निवडताना गुप्त मतदान न घेता, तो आवाजी मतदानाने निवडला जावा, अशी सुधारणा सरकारने केली आहे. राज्यपालांनी सोमवारी सकाळी राज्य सरकारला गुप्त खलिता पाठवला. यात राज्यपालांनी ही सुधारणा घटनाबाह्य असल्याचा आक्षेप घेतला. सोमवारी सायंकाळी सरकारनेही निवडणूक घेण्याबाबत ठाम राहण्याची भूमिका घेतली आहे. यामुळे, राज्यपाल आणि महाविकास आघाडीचे सरकार यांच्यातील संघर्ष नव्या पातळीवर पोहोचला आहे. महाराष्ट्रात लक्तरे इतकी कधी लोंबली नव्हती. महाराष्ट्र करोनाच्या तिसऱ्या लाटेच्या शंकेने सावध झाला आहे आणि दुसरीकडे, महाविकास आघाडी व केंद्राचे प्रतिनिधी असणारे राज्यपाल परस्परांवर कुरघोडी करण्यासाठी निमित्तेच शोधत आहेत. राज्यपाल आणि सरकार यांच्यात पत्रव्यवहार चालू असला, तरी दोन्हीकडचे नेहमीचे तोंडाळ नेते त्यात पडलेच. राज्यपालांनी अध्यक्षीय निवडणुकीसाठी आधी दोनदा विचारणा केली असताना काय केलेत, असा प्रश्न विचारला जातो आहे, तर राज्यपाल 'फार अभ्यासू' असल्याची प्रमाणपत्रेही वाटली जात आहेत. सार्वजनिक चर्चेचा स्तर असा खाली येणार नाही आणि घटनात्मक पदांची अवहेलना होणार नाही, याची काळजी सरकार आणि 'राजभवन'च्या सल्लागारांनाही का घेता येऊ नये? राज्यपाल केंद्र सरकारच्या सोयीने आणि सल्ल्याने अनेक डाव व पेच टाकत असतात. पहाटेचा शपथविधी हे त्याचे ठळक उदाहरण. राज्यपालांनी विधान परिषदेतील १२ सदस्यांची नेमणूक ज्या रीतीने अडवून ठेवली आहे, ती सरकारच्या नाकाला झोंबली आहे. विधानसभेतील १२ विरोधी आमदार निलंबित करण्याची चाल, म्हणजे राज्यपालांना सरकारने दिलेले उत्तर होते, असेही म्हटले गेले. याचा अर्थ, एका घटनात्मक पदाला शह देण्यासाठी दुसरे घटनात्मक पद वापरण्यात आले का? विधानसभा अध्यक्षांच्या निवडीबाबत राज्यपालांनी घेतलेला एक आक्षेप विधानसभा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या निवडीची प्रक्रिया समान नाही, असा आहे. तसा तो असेल, तर राज्य सरकारने याचा योग्य तो खुलासा करायला हवा होता. आवाजी मतदानाने अध्यक्षांची निवड करण्याचा नियमबदल घटनाबाह्य आहे, असे राज्यपाल स्पष्ट शब्दांत म्हणत असतील, तर हा मुद्दा कोणत्याही क्षणी न्यायालयीन संघर्षाचा होऊ शकतो. महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षीय निवडीच्या नियमांमधील काही बदल 'राजपत्रा'त प्रकाशित झाले आहेत. त्यात पोटनियम एकमध्ये 'निवडणूक घेण्यासाठी' अशी शब्दरचना होती. ती बदलून आता 'मुख्यमंत्री यांच्या शिफारसीवरून अध्यक्षांची निवड करण्यासाठी' असा मजकूर आला आहे. हे राजपत्र २३ डिसेंबर २०२१ रोजी प्रकाशित झाले. हा बदल नेमका का केला आणि तो करणे हे कितपत उचित होते, याचा खुलासा राज्य सरकारला उद्या केवळ राज्यपालांकडेच नव्हे, तर न्यायपालिकेसमोरही करावा लागू शकतो. या साऱ्या नियम बदलांमागे असणारे राजकारण सर्वांना माहीत आहे. गुप्त मतदान झाले आणि काही मते फुटून विरोधकांच्या उमेदवाराला मिळाली, तर सत्ताधारी आघाडीत अविश्वासाचे नवेच वातावरण तयार होईल. परस्परांकडे संशयाने पाहणे आणि माध्यमांमध्ये संशयित आमदारांची नावे सोडून देणे, असे प्रकारही घडू लागतील. ही शक्यता पाहता, खुल्या आवाजी मतदानाने होणारी निवडणूक केव्हाही श्रेयस्कर वाटू शकते. ही निवडणूक होत असतानाही ज्या आमदारांना आपल्या पक्षाच्या किंवा आघाडीच्या उमेदवाराच्या विरोधात मतदान करायचे असेल, तो सदस्य आपले वेगळे मत अध्यक्षांच्या निदर्शनास आणून देऊ शकतो. अशा वेळी, पीठासीन अधिकारी मतविभागणीचा आदेशही देऊ शकतात; मात्र राज्यात सगळ्यांना मतलबी, छुपे आणि विश्वासघाताचे राजकारण खेळायचे आहे. या साऱ्या खेळात 'राजभवन' दिसू लागले आहे; हे दु:खद आणि चिंताकारक आहे.

# ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर कोरोना प्रतिबंधक उपाययोजना राबविण्यासाठी जिल्हा प्रशासनाचे अहोरात्र अथक प्रयत्न



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

नववर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांची रायगड जिल्ह्यात अलिबागसह इतर तालुक्यातील पर्यटनस्थळांवर मोठ्या प्रमाणावर गर्दी सुरू झाली आहे. मात्र ओमायक्रॉन या नव्या व्हेरिएंटच्या वाढत्या प्रादूर्भावास रोखणे, हेदेखील नागरिकांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाचे आहे. यासाठी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासनाकडून विविध स्तरांवर अहोरात्र अथक प्रयत्न सुरू आहेत.

प्रांताधिकारी, तहसिलदार, मुख्याधिकारी यांच्या स्तरावर त्यांच्या कार्यक्षेत्रातील हॉटेल मालक, रिसॉर्ट मालक, पर्यटन क्षेत्राशी संबंधित इतर घटक यांच्या बैठका घेण्यात येत असून सर्वांना कोविड अनुरूप वर्तनाविषयी सविस्तर माहिती देण्यात येत आहे. नागरिकांना विविध माध्यमांमधून मास्क वापरणे, सॅनिटायझरचा वापर करणे, सामाजिक अंतर पाळणे, लसीकरण करून घेणे याविषयी सातत्याने आवाहन केले जात आहे. त्याचबरोबर येणाऱ्या पर्यटकांची थर्मल स्कॅनरने तपासणी, त्यांनी लसीकरण केले आहे किंवा कसे, याबाबतची विविध तपासणी नाक्यांवर चौकशी करण्यात येत आहे. ठिकठिकाणी कोविड प्रतिबंधक उपाययोजनांविषयीचे सूचना फलक लावण्यात आले आहेत. आरोग्य विभागाच्या, नगरपालिकेच्या फिरत्या वाहनांवरील लाऊडस्पीकरद्वारे नागरिकांना काळजी घेण्याचे, कोविड प्रतिबंधक नियमांचे पालन करण्याविषयी आवाहन केले जात आहे. स्थानिक प्रशासनाचे अधिकारी-कर्मचारी जिमखाना, क्लब, मंगल कार्यालये, रेस्टॉरंट, सिनेमागृहे, शॉपिंग मॉल, दुकाने, धार्मिक स्थळे, कोचिंग क्लासेस, खाजगी कार्यालये, सार्वजनिक स्थळे इत्यादी ठिकाणी भेट देत असून ज्या ठिकाणी नागरिक विनामास्क आढळत आहेत त्यांच्यावर तात्काळ दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. तरी रायगड जिल्ह्यातील नागरिकांनी तसेच येथे येणाऱ्या पर्यटकांनी नववर्षाचे स्वागत उत्साहाने जरूर करावे, मात्र सर्वांनी स्वत:च्या व कुटुंबाच्या काळजीसाठी मास्क वापरणे, सॅनिटायझरचा वापर करणे, सामाजिक अंतर पाळणे, लसीकरण करून घेणे या कोविड प्रतिबंधक मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालनही करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी केले आहे.

# पेणमध्ये आजपासून कबड्डीचा थरार

**दै.रायगड नगरी । पेण**

आजपासून पेण कबड्डी प्रीमियर लीग स्पर्धेचे आयोजन पेण तालुक्यातील गोविर्ले येथे करण्यात आले आहे. मात्र नव्याने आलेल्या ओमायक्रोन कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाने लादलेल्या नवीन नियमावलीचे काटेकोरपणे पालन करून हे सामने आयोजकांना पार पाडावे लागणार आहेत.

मात्र कबड्डी हा खेळ फक्त पेणच नव्हे तर संपूर्ण रायगड जिल्ह्यातील क्रीडा रसिकांचा लोकप्रिय खेळ असल्याने या ठिकाणी हजारोंच्या संख्येने क्रीडा रसिकांची गर्दी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शासनाने लादून दिलेल्या कोरोना प्रतिबंधक नियमांचे पालन योग्य प्रकारे होते की नाही याकडे स्थानिक पोलीस व प्रशासनाला लक्ष ठेवावे लागणार असून या स्पर्धेत नियमांचे पालन करण्याबाबत प्रशासनाची कसोटी लागणार आहे.

नव्याने ओमायक्रोन कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव दिसून येत असल्याने शासनाने लागू केलेल्या कडक नियमावलीचे पालन करत स्पर्धेच्या ठिकाणची प्रेक्षक संख्या, प्रेक्षकांनी घेतलेले कोरोना प्रतिबंधक लसीचे दोन डोस, सध्या सुरू असलेले नाईट कर्फ्युचे बंधन याचे काटेकोरपणे पालन होते की नाही याकडे मात्र दादर सागरी पोलीस स्टेशन, उप विभागीय पोलीस कार्यालय, प्रांत कार्यालय व पेण तहसिल कार्यालय प्रशासनाला लक्ष ठेवून राहावे लागणार आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## श्रीवर्धन समुद्र किनारी धोकादायक पॅरासीलिंग पुन्हा कोणाच्या आशीर्वादाने सुरू

असल्याचे देखील म्हटले जात आहे. कारण पॅरासिलिंग करणाऱ्या टीमची भोजनाची व राहण्याची व्यवस्था देखील या बलाढ्य राजकीय नेत्याच्या आशीर्वादानेच सुरू असल्याचे दिसत आहे. पॅरासिलिंगचे आकर्षण पर्यटकांना मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे पॅरासिलिंग सुरू असल्याने पर्यटक या ठिकाणी मोठ्या प्रमाणात येतील अशी शक्यता व्यक्त करुन सदरचे पॅरासेलिंग सुरू करण्यात आल्याचे बोलले जात आहे. परंतु एखाद्या पर्यटकाचा अपघात झाल्यानंतर त्याला पूर्णपणे विमा संरक्षण देण्यात येईल किंवा नुकसान भरपाई देण्यात येईल का? असा प्रश्न देखील येणाऱ्या पर्यटकांकडून उपस्थित केला जात आहे. तरी श्रीवर्धन तालुका प्रशासनाने व पोलीस प्रशासनाने सदर पॅरासिलिंग करणाऱ्यांची पूर्णपणे चौकशी करावी अन्यथा ते कायमचे बंद करावे. अशी मागणी नागरिकांमधून व येणाऱ्या पर्यटकांना मधून केले जात आहे.

## कोकणातील आपत्ती निवारणासाठी कायमस्वरुपी योजना राबविणार

आपत्ती आणि संकटाला सामोरे जावे लागू नये म्हणून सर्व नदी, नाले यांचे खोलीकरण करण्यात येईल. यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूदही केली असल्याचे त्यांनी सांगितले. हे कार्य जलसंपदा विभागामार्फत तसेच खारजमीन विकासाच्या माध्यमातून राबविले जाईल, असे त्यांनी सांगितले.

शाळेचे नुकसान, आरोग्य केंद्र, विद्युत जोडणी यासारख्या सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीसंदर्भात मदत केली जाईल, असेही त्यांनी सांगितले. या विषयाच्या अनुषंगाने उपस्थित झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री अनिकेत तटकरे, विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, बाळाराम पाटील, ड. निरंजन डावखरे, भाई गिरकर, कपिल पाटील, आदींनी सहभाग घेतला.

## संपामुळे एसटीचे आतापर्यंत ६०५ कोटींचे नुकसान : ना.अनिल परब

नाही. या कामगारांना कामावर परतण्यासाठी अनेक संधी दिल्या. त्यामुळे एसटी पूर्णपणे क्षमतेने सुरू झाल्यानंतरच याबाबत विचार करता येईल, असेही ते म्हणाले. एसटी संपादरम्यान पाच एसटी कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला असून, या मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याचे निर्देश महामंडळाला देण्यात आले आहेत. यासंदर्भात छाननी सुरू आहे.

कामगारांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याचा कोणताही ठराव झालेला नाही, असे परिवहन मंत्र्यांनी स्पष्ट केले. एसटी कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ केली असून, देशातील कोणत्याही राज्यात मिळणाऱ्या पगाराएवढा पगार आता या कर्मचाऱ्यांना मिळत आहे. पगार दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत नियमित जमा होईल याची हमी सुद्धा राज्य शासनाने घेतली आहे, अशी माहितीही मंत्री परब यांनी दिली.

विलिनीकरण संदर्भात त्रिसदस्यीय समितीचा जो काही अहवाल येईल तो राज्य सरकार मान्य करेल. तोपर्यंत कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात राज्य सरकारने भरीव वाढ करूनही एसटी कामगारांचा संप सुरू असल्यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. अफवांचे बाजार उठवून हा संप भडकवला जात आहे, कामगारांनी अफवांना बळी पडू नये, असे आवाहनही मंत्री परब यांनी यावेळी केले.

## तळ्यामध्ये गांजा बंद, गुटखा विक्री सुरूच

असल्यामुळे पोलीस फारसे लक्ष देत नाहीत. पण अर्थपूर्ण तडजोड मात्र पोलिसांकडे केली जात असल्याचे बोलले जात आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे कार्यालय तळ्यामध्ये नाही. पेण मधून अधिकारी व कर्मचारी तळ्यामध्ये येतच नाहीत. यामुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर कोणाचाच अंकुश राहिलेला नाही. मार्केटमधील वैध व अवैध व्यापाराची जबाबदारी स्थानिक प्रशासन आणि पोलिस प्रशासनाची आहे. प्रशासन प्रामाणिकपणे काम करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करते पण गुटखा विक्री करणाऱ्यांवर काहीही कारवाई केली जात नाही. नियमाप्रमाणे ज्या दुकानामध्ये अशाप्रकारे अवैध व्यवसाय सुरू आहे त्यांच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे. त्यांचा परवाना रद्द केला पाहिजे. परंतु अवैध व्यवसायामध्ये अनेकांचे हात गुंतलेले आहेत. अर्थमय हेतूमुळे कारवाई करायची कोणी असा प्रश्न उपस्थित होत आहे. यामुळे रोज तब्बल ५० किलोपेक्षा जास्त गुटखा या परिसरात विकला जावू लागला असल्याने मार्केटमधील व्यापारी व नागरिकांनीही नाराजी व्यक्त करण्यास सुरवात केली आहे.

७ ते ६० रूपयां पर्यंत गुटख्याची विक्री असून जवळपास ४० दुकानात गुटखा विक्री होत आहे. सर्व प्रकारचा गुटखा विक्रीला उपलब्ध आहे. विमल व गोवा १० ते २५ रूपये, रजनीगंधा २० रूपये व आरएमडी माणिकचंद गुटख्यासाठी ३० ते ४० रूपये घेतले जात आहेत. बंदी असल्याने गुटखा जादा दराने विकला जात आहे. खुलेआम विक्री सुरू असूनही त्यावर कोणीच कारवाई करत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे खरेदी करण्यासाठी आलेल्या लहान मुलांनाही गुटखा दिला जात आहे. म्हसळा तालुक्यातून गुटखा येत असल्याचा संशय आहे येथे आल्यानंतर तो होलसेल दुकानात दिला जातो येथून तो मार्केटमधील सर्व दुकानदारांना वितरीत केला जात आहे. यामध्ये मोठे रॅकेट कार्यरत असल्याची चर्चा सध्या सुरू आहे. अर्थमय तडजोडीमुळे तळा बाजारपेठ आणि ग्रामीण भागात बिनधास्तपणे गुटखा विक्री होत असूनही आतापर्यंत एकाही दुकानावर कारवाई झालेली नाही. तळा पोलिस प्रशासनाने पूर्णपणे अभय दिलेले आहे.पोलिस अधिकारी व कर्मचारी माहिती असूनही गप्प बसत आहेत. अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारीही या परिसरात फिरकत नसल्याने अर्थमय तडजोडी झाल्या आहेत का असा प्रश्न प्रामाणिक नागरिक विचारू लागले आहेत.

तळा बाजारपेठेत होलसेल दरात गुटखा उतरला जातो या होलसेल दुकानदारांचा सध्या दबदबा आहे. पोलीस प्रशासन या होलसेलरकडून मॅनेज केले जात असल्याचे बोलले जात असून गुटखा मागवून तो शहर आणि ग्रामीण भागात पुरविण्याचे काम हे होलसेलर बिनधास्त करत आहेत त्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवल्यास मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पण पोलीस याकडे दुर्लक्ष करत आहेत.

# शिवसेनेकडून ग्रामीण विकासाची पूर्तता; पाणी पुरवठा योजनांसाठी करोडो रुपयांचा निधी मंजूर होणार

**दै.रायगड नगरी । तळा**

शहरांचा सतत विकास होत असूनसुद्धा शहरातील लोकसंख्येपैकी ग्रामीण भागात राहणाऱ्यांचे प्रमाण थोडे अधिकच आहे. साहजिकच आर्थिक नियोजनाद्वारा संपूर्ण तालुक्याचा विकास साधण्यासाठी ग्रामीण विकास अत्यंत आवश्यक ठरतो आणि म्हणूनच ग्रामीण समस्यांचे स्वरूप नीटपणे समजावून घेऊन त्या सोडविण्याचे प्रयत्न शिवसेनेकडून केले जात आहेत यासाठी मूलभूत गरज म्हणून शिवसेनेने पाणी समस्येकडे लक्ष दिले असून पाणी पुरवठा मंत्री ना.गुलाबराव पाटील यांच्याकडून तळा तालुक्यातील पाणी पुरवठा योजना मंजूर करून ग्रामीण विकासाला चालना दिली जाणार आहे.

रायगड जिल्हा प्रमुख, अनिल नवगणे, तालुका प्रमुख प्रदुम्न ठसाळ, यांनी मंत्रालय येथे ना.गुलाबराव पाटील यांची भेट घेऊन पाणी पुरवठा योजना मंजूर करण्याचे निवेदन ना.पाटील यांना दिले

या निवेदनाची दखल घेऊन त्यांनी त्वरित या कामांना जलजीवन मिशन पाणी पुरवठा योजने अंतर्गत प्रस्ताव तत्काळ मंजूर करण्याचे आदेश रायगड जिल्हा परिषदस दिले आहेत.



त्यानुसार कुडे, मालुक, कासेवडी, चरई बुद्रुक, कुंभळे, बारपे, महुरे, महागाव, पाचघर,अडनाळे, मालाठे, दहीवली, तळेगाव, वरळ, बहुलेवाडी येथील पाणी प्रश्न मार्गी लागणार असल्याचे तालुका प्रमुख प्रदुम्न ठसाळ यांनी सांगितले

# इंडियन पोर्ट असोसिएशन सोबत सहा महासंघाची बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

आयपीएच्या व्यवस्थापनाने ६ टीव्ही हासंघाना बीडब्ल्यूइसिच्या झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने नवी दिल्ली येथे २२डिसेंबर २०२१ रोजी द्वि पक्षीय बैठकीमध्ये उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. भारतीय पोर्ट एवं डाक मजदूर महासंघाचे अध्यक्ष प्रभाकर उपरकर व जनरल सेक्रेटरी सुरेश पाटील तर आयपीये व्यवस्थापनाचे चेअरमन विनीत कुमार, ॲडव्हायजहर - आर डी त्रिपाठी, एम डी -अरविंद चौडे सदर बैठकीस उपस्थित होते. या बैठकीत भारतीय मजदूर संघाच्या वतीने विविध विषयावर बीएमएसचे अध्यक्ष प्रभाकर उपरकर, जनरल सेक्रेटरी सुरेश पाटील यांनी आपली बाजू आय पी ये च्या अधिकाऱ्यांसमोर मांडली.

यावेळी विविध विषयावर चर्चा करण्यात आली. नुसार भारतातील सर्व बंदरात कामगार विश्वस्त हा कामगार असला पाहिजे. सदर कामगार विश्वस्त हा निवृत्त कामगार किंवा बाहेरचा नसावा. भारतातील सर्व बंदरात निवडणूक प्रक्रिया ही गुप्त पद्धतीने झाली पाहिजे. एकूण सहा फेडरेशनचे (संघटनाचे ) विचार ऐकल्यानंतर पोर्टनुसार ५५%- ४५% उत्पादकता गुणोत्तर सध्याच्या २०२१ साठी पीएलआर(बोनस ) देण्याचे व्यवस्थापनाने चर्चेत मान्य केले.बी डब्ल्यू एन सीच्या निवडीच्या प्रक्रियेस विलंब होत आहे. या विषयावर लवकरच बैठक घेऊन शिपिंग मंत्रालयाशी लवकरच संपर्क साधला जाणार असल्याचेआय पी ये च्या व्यवस्थापनाने पदाधिकाऱ्यांना सांगितले.

व्यवस्थापनाने मंत्रालयाशी चर्चा करून सौदार्हपूर्ण तोडगा काढण्याचे तसेच सीसी एस पेन्शन रुल १९७२ नुसार पेन्शन नियमन आणि शिफारशी बाबत सेक्रेटरी (मंत्रालय बंदरे व जहाज बांधणी आणि जलमार्ग )यांच्याशी बैठक लावून देण्याचे आय पी येच्या अध्यक्षांनी मान्य केले. मुंबई बंदर, गोवा बंदर अध्यक्षांशी चर्चा करून विलंब न करता मुंबई गोवा पोर्ट ट्रस्ट कामगार आणि पेन्शन धारकांना मागील थकबाकी, पेन्शन देण्यासाठी योग्य ती कारवाई करू असे आश्वासन आयपीयेच्या व्यवस्थापन कमिटीने बी एम एस च्या पदाधिकाऱ्यांना दिले.जेएनपीटी बंदरातून सुरेश पाटील हे एकमेव असे कामगार नेते पदाधिकारी सदर बैठकीला उपस्थित होते.भारतातील बंदरातील विविध समस्या सोडविण्यासाठी बी एम एस चे जनरल सेक्रेटरी सुरेश पाटील हे विशेष प्रयत्न करीत आहेत.

# श्री विठोबा देवस्थान ताकईची नूतन कार्यकारिणी जाहीर

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खालापूरसह रायगड, पुणे, नवी मुंबई परिसरातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री विठोबा देवस्थान ताकईची नूतन कार्यकारिणी आज मंगळवार, दि. २८ डिसेंबर २०२१ रोजी जाहीर करण्यात आली. देवस्थान कमिटीच्या अध्यक्षस्थानी अनंत गोविंद पाटील तर उपाध्यक्षपदी जयवंत लक्ष्मण पाटील यांची निवड करण्यात आली. ताकई येथील यात्रा राज्यभर प्रसिद्ध आहे. विठुरायाच्या दर्शनासाठी खालापूरसह रायगड, पुणे, नवी मुंबई परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जेष्ठ सदस्य रघुनाथ शंकर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली श्री विठोबा देवस्थान समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. सचिवपदी नारायण दामू पाटील यांची निवड करण्यात आली तर सदस्यपदी रघूनाथ शंकर पाटील, काशिनाथ ना. पाटील, ॲड आबासाहेब विचारे, रामदास गोविंद पाटील, तानाजी मारुती पाटील, नरेंद्र शहा, प्रकाश रा. शहाणे, काळुराम ढमाले, गौर लहू पाटील, प्रो. काबुराम महादेय पाटील, शिवसेना गटनेते सुनिल गोटीराम पाटील, संजय नारायण पाटील आदींची निवड करण्यात आली.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड येथील महसूल दप्तरी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी या जमिनीचे मालक सुनिता प्रकाश घरत व इतर रा.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतींचे वर्णन**

**मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.प्रती | आकार |
|---|---|---|---|
| १६५ | ४ | ०-३३-००<br>पो.ख.०-०५-००<br>एकूण ०-३८-०० | ४.७५ |

वरील वर्णनाची शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसा हक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा, कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी रस्ता, पाणी येण्या-जाण्याचा रस्ता अथवा वहिवाटी वगेरे कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यासंबंधची व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी कागदपत्रांच्या स्वरुपात स्वतःहून हजर होवून आमचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत कळवावे. वरील मुदतीत कोणीही कसलीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही असे समजण्यात येईल किंवा असल्यास तो हक्क व हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास ती हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.२८/१२/२०२१
स्थळ : उरण

**सही/-**
**ॲड.योगेश नामदेव म्हात्रे**
**रा.कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड**
**९८१९९१०८०८/८०९७१०८०६०**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# ग्रामविकास मंत्री यांचे लक्ष वेधण्यासाठी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे बेमुदत धरणे आंदोलन

## रायगड जिल्हा ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेतर्फे प्रलंबित मागण्यांसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांचे लक्ष वेधण्यासाठी दि..१ जानेवारी २०२२ पासून कोल्हापूर येथील बिंदू चौक येथे बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार असून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या स्थानिक शासनमान्य व प्रलंबित मागण्यांसाठी रायगड जिल्हा ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेतर्फे जिल्हाध्यक्ष मंगेश म्हात्रे यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना एक निवेदन सादर करण्यात आले आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या अनेक आर्थिक मागण्या शासन-प्रशासनाकडे प्रलंबित असून तालुका आणि जिल्हा स्तरावरील काही शासन मान्य मागण्या अंमलबजावणी स्तव प्रलंबित आहेत.राहणीमान भत्याची अदाई, भविष्य निर्वाह निधीचे खाते अद्ययावत करणे, काही ठिकाणी सेवा पुस्तिका सुद्धा अद्ययावत नाही. अशी परिस्थिती आहे.स्थानिक पातळीवरील प्रश्न तातडीने सुटावेत.त्यानुसार शासन निर्देशानुसार संघटना प्रतिनिधी समवेत बैठकीचे आयोजन करणे महत्वाचे आहे.

शासन स्तरावरील प्रलंबित मागण्या मंजूर व्हाव्यात म्हणून महासंघाच्या वतीने दि.१ जानेवारी २०२२ पासून कोल्हापूर येथील बिंदू चौकात बेमुदत आंदोलन करण्यात येणार आहे. राज्याचे ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांचे लक्ष वेधण्यासाठी महासंघाला नाईलाजाने हा निर्णय घ्यावा लागला आहे.ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा राहणीमान भत्त्याची अदाई, भविष्य निर्वाह निधीचे खाते अद्ययावत करणे, सेवा पुस्तकांचे राहिलेले अपुर्ण काम, शासनाच्या निर्देशानुसार दि.१० ऑगस्ट २०२० ने मंजूर केलेल्या किमान वेतनाची अंमलबजावणी उत्पन्न असूनही ज्या ग्रामपंचायती करीत नाहीत.त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी व फरकानुसार रक्कम अदा करण्यात करावी,दहा टक्के मधून ज्येष्ठता यादी नुसार चार वर्षांपासून असणारी रिक्त पदे तातडीने भरून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना जि.प.सेवेत समाविष्ट करून घ्यावे, जिल्हा परिषदेमध्ये आरोग्य विभागाची भरती करताना ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची शिल्लक पदे न भरता कारवाई केलेली आहे.त्यामध्ये ग्रा.प.कर्मचा-यांचा समावेश करुन लाभ देण्यात यावा, पंचायत समिती गटविकास अधिकारी यांनी तालुका पातळीवर तीन महिन्यांतून एकदा संघटना प्रतिनिधी सोबत सभा आयोजित करावी,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांनी वर्षातून दोन वेळा शासन निर्णयाप्रमाणे संघटना प्रतिनिधी बैठक घेऊन स्थानिक पातळीवरील प्रश्न सोडवावेत,कोरोना काळात कर्मचा-यांनी शंभर टक्के सहभाग घेऊन गावामध्ये फवारणी, लसीकरण,कोरोना ग्रस्ताना मदत करणे या कामी सहकार्य करुनही त्यांना देण्यात येणारा भत्ता सलग तीन महिन्यांचा असून सुद्धा दिली नाही.तो अदा करण्यात कार्यवाही करण्यात यावी, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना ग्रामपंचायतीमध्ये विनाकारण त्रास देणे, पगार वेळेवर न देणे,रजा न देणे या गोष्टी घडत असतात.या बाबत सर्व ग्रामपंचायतीच्या सरपंच/ ग्रामसेवक यांना पत्राद्वारे समज देण्यात यावी,कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी काम करताना निधन पावलेल्या कर्मचा-यांच्या कुटुंबाला विमा कवचाची रक्कम मिळण्यासाठी आपणाकडून तातडीने कार्यवाही करण्यात यावी आदी. मागण्या संदर्भात आपणाकडून बैठकीचे आयोजन तातडीने करण्यात येऊन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा.अशी मागणी संघटनेतर्फे देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

रायगड जिल्हा ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष मंगेश म्हात्रे, उपाध्यक्ष सुहासिनी मोकाशी, संतोष चव्हाण, गोविंद म्हात्रे,सचीव रमेश तांडेल, अरुण देसाई,भरत एरंडकर, विजय कदम, संतोष लखमा मोरे, नरेश कालेकर, गणेश मोरे,प्रकाश अष्टमकर, विजय मते, जनार्दन कांबळे, विठोबा धुमाळ, संतोष मोरे,प्रवीण लोहा, विकास पाटील,स्वप्नाली भगत यावेळी उपस्थित होते.

# संक्षिप्त...

## लावेचीवाडी येथे सभामंडप भूमिपूजन सोहळा संपन्न



**दै.रायगड नगरी । नागोठणे**

कोकणचे भाग्यविधाते रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या आशीर्वादाने रायगडच्या पालकमंत्री ना. अदितीताई तटकरे व तरुणांचे प्रेरणास्थान आमदार अनिकेतभाई तटकरे यांच्या मार्गदर्शनाने नागोठणे विभागातील पाटणसई ग्रामपंचायत हद्दीतील लावेचीवाडी (वासगाव ) येथे जि. प. सेस फंड (२० %) अंतर्गत ५ लाख रुपये निधीतुन सभामंडप बांधण्यात येणार असून या सभामंडपाचे भूमिपूजन रोहा पं. स. चे माजी सभापती व पाटणसई ग्रामपंचायतीचे मार्गदर्शक सदानंद गायकर यांच्या हस्ते मंगळवार दि. २८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता संपन्न झाले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे विभागीय नेते भाई टके, शिवरामभाऊ शिंदे, विभागीय अध्यक्ष संतोषभाई कोळी, विभागीय कार्याध्यक्ष तथा पाटणसई ग्रामपंचायत सदस्य सचिन कळसकर, युवक राष्ट्रवादी जिल्हा सरचिटणीस विनय गोळे, युवक राष्ट्रवादी विभागीय अध्यक्ष प्रमोद जांबेकर, ऐनघर पं. स. गण उपाध्यक्ष बाळकृष्ण देवरे, पाटणसई माजी सरपंच झिमाशेठ कोकरे, माजी उपसरपंच लिंबाजी पिंगळा, ग्रामपंचायत सदस्य दिपक महाडिक, गणपत पिंगळा, बेबीताई पिंगळा, दुर्धादास उघडा, चंद्रकांत बावदाने, जानू शिद, के. के. शिद, यशवंत पिंगळा व लावेचीवाडी येथील ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

# उरण - पनवेल मार्गावर लालपरी सुरू झाल्याने प्रवाशांच्या आशा पल्लवित

**दै.रायगड नगरी । उरण**

राज्यातील एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विविध मागण्यांसाठी त्यांचे राज्य सरकारमध्ये विलीनीकरण करावे अशी जोरदार मागणी करून बेमुदत संप पुकारला आहे. मात्र राज्यातील प्रमुख मार्ग असलेल्या पनवेल डेपो मधून उरणकडे एसटीच्या गाड्यांची रेलचेल सुरू झाली असून,त्यामुळे लालपरी रस्त्यावर आल्याने खाजगी प्रवासात दररोज खिशाला कात्री बसणाऱ्या सामान्य प्रवाशांच्या आशा पल्लवित झाल्या आहे.

उरण, पनवेल, नवीमुंबई, ठाणे आणि मुंबई येथे नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला असून, लालपरी सुरू झाल्याने पुढील प्रवासासाठी रेल्वे स्थानक गाठण्यासाठी हक्काच्या लालपरीची सेवा सुरू झाल्याने तालुक्यातील प्रवाशांना आशेचा किरण दिसू लागला असून, प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



# अवचितगड प्रतिष्ठान वतीने नाताळ सणानिमित्त रेवोली शाळेत मास्क व खाऊचे वाटप

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहा तालुक्यातील अवचितगड प्रतिष्ठानच्या वतीने संस्थापक अध्यक्ष उदय मोरे यांनी नाताळ सणाचे अवचित्य साधून रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रेवोली व अंगणवाडी शाळा रेवोली या शाळेतील मुला मुलींना मास्क शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.

गेली दोन वर्ष कोरोनामुळे शाळा बंद होत्या त्याचा परिणाम मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर काही प्रमाणात होत असतानाच या वर्षी शाळा सुरु करण्यात आल्या आहेत शाळा सुरु झाल्याने शिक्षक विद्यार्थी पालक यांच्यामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होत आहे मुलांमध्ये पुन्हा शिक्षणाबद्दल आवड व जन जागृती निर्माण व्हावी या हेतूने अवचितगड प्रतिष्ठान ने सामाजिक बांधिलकी जपत अल्पशः प्रयत्न केला आहे. सदर कार्यक्रम शाळा व्यवस्थापन समिती व पालक संघाच्या अध्यक्षा प्रांजली प्रमोद शेलार सदस्या शुभांगी मनोहर रेवाळे ललिता तुकाराम घरट चैतन्य चेतन महाले नीता सुनील पवार सलोनी सत्यवान भोईर वनिता संदीप हळदे अंगणवाडी सेविका अपर्णा अनंत घरट मुख्याध्यापिका मनीषा उदय मोरे शिक्षक प्रतिनिधी शिल्पा गणेश दुधबर्वे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. हा उपक्रम राबविल्याबद्दल शाळेच्यावतीने अवचितगडचे अध्यक्ष उदय मोरे सरचिटणीस हरेश राम कापसे रायगड जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता के. वाय. बारदेशकर यांना धन्यवाद देण्यात आले.

# परदेशी रानमोडीने मोडले सारे रान ; जैवविविधता धोक्यात

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड जिल्ह्यातील कोणत्याही डोंगरमाथ्यावर, माळरानावर, रस्त्याच्या कडेला अथवा शहर आणि गावातही बारीक पांढरी फुलांनी भरलेली दाट हिरवी झुडपे पाहायला मिळत आहे. रानमोडी म्हणून परिचित असलेली ही वनस्पती तिच्या नावाप्रमाणे रानमोडत आहे. झपाट्याने वाढणारी ही परदेशी वनस्पती पूर्णतः निरोपयोगी असून अन्य स्थानिक झाडे आणि गवताच्या वाढीसाठी अडथळा ठरत आहे. शिवाय जैवविविधतेला तिच्यामुळे धोका असल्याने पर्यावरणप्रेमी व निसर्ग अभ्यासकांनी चिंता व्यक्त केली आहे. पाली सुधागडातील जंगल भागात ही वनस्पती अधिक फोफावत असल्याचे दिसून येतेय.



मागील १० ते १५ वर्षांत या रानमोडीने संपूर्ण रायगड जिल्ह्याचे बहुतांश क्षेत्र व्यापले आहे. तिचे परागकण व बारीक पाकळ्या मोठ्या प्रमाणावर हवेत पसरत असल्याने अनेकांना श्वसनाचा त्रास देखील होतो.

पावसाळा संपल्यानंतर अनेक झुडपे आणि विविध प्रकारचे गवताची वाढ थांबते किंवा त्या मरण पावतात. परंतु रानमोडीची दाट हिरवाई कायम आहे. पांढऱ्या रंगाची बारीक फुले त्यावर उमललेली असल्याने ती सर्वांचे लक्ष वेधत आहेत. अनेकांना हा निसर्गाचा चमत्कार वाटत असला तरी त्याचे दुष्परिणाम मोठे आहेत. ते अनेकांना ही माहित नाही. पर्यावरण अभ्यासक प्रवीण कवळे यांच्यासह अनेक निसर्ग अभ्यासकांनी त्याला दुजोरा दिला आहे.

रानमोडी ही मूळची अमेरिकन झुडूपवर्गीय सूर्यफूल कुळातील वनस्पती आहे. तिचे शास्त्रीय नाव क्रोमोलेनिया ओडेरेटा (उहीेश्रस्रपशर `वरीरींर) असे आहे. रानमोडी दीड ते दोन मीटर उंच वाढते तिला ९६ हजार ते एक लाख साठ हजारांपेक्षा अधिक बिया येतात. त्या हवेद्वारे वातावरणात पसरतात आणि पावसाळ्यात रुजतात. मुळाद्वारे देखील तिचा प्रसार होतो. रानमोडीमुळे स्थानिक गवताच्या प्रजाती आणि इतर पावसाळी आढळणाऱ्या वनस्पती यांच्या वाढीवर मर्यादा येत आहे. या वनस्पतीचा पशुपक्षी प्राणी वगैरे ना तसा काहीच उपयोग नाही. उग्र वास असलेली ही वनस्पती असून तिच्या झुडपातून गेल्यास अंगाला उग्र वास व खाज देखील येते. त्यामुळे तिचे समूळ उच्चाटन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# आयुक्त (कृषी) धीरज कुमार यांनी घेतली विविध प्रयोगशील व प्रगतशील शेतकऱ्यांची भेट

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आयुक्त (कृषी) धीरज कुमार यांनी दि.२६ डिसेंबर २०२१ रोजी अलिबाग तालुक्यातील प्रयोगशील शेतकरी डॉ.संदेश पाटील (पालांबे) यांच्या फळबागेत जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपनी/ संस्था यांचे प्रतिनिधी व इतर शेतकरी यांच्याशी चर्चा केली. त्यावेळेस त्यांनी आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे समस्या जाणून घेतल्या व त्यावर मार्गदर्शनही केले.

तसेच त्यांनी अलिबाग येथील पांढरा कांदा उत्पादक गटास भेट दिली. त्यावेळी गटाचे अध्यक्ष सचिन पाटील, उपाध्यक्ष विकास पाटील, प्रगतशील शेतकरी सतीश म्हात्रे व इतर शेतकऱ्यांशी चर्चा केली, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. पांढरा कांदा भौगोलिक नामांकनाचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ व्हावा, यासाठी पांढरा कांदा उत्पादक शेतकऱ्यांची संख्या वाढवून तालुक्यातील अधिकाधिक क्षेत्र पांढरा कांदा उत्पादनाखाली आणावे, शेतकरी ते थेट ग्राहक विक्री करावी, तसेच जास्तीत जास्त कांदा निर्यात होईल, असे पाहावे असेही धीरज कुमार यांनी सांगितले. याशिवाय धीरज कुमार यांनी नागाव येथील अनिल विष्णू पाटील यांच्या शेतावरील महाराष्ट्र रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात आलेल्या सुपारी लागवडीची पाहणी केली.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली शेतजमीन मिळकत या मिळकतीसमोर लिहिलेल्या कब्जेदारांकडून आमचे अशिल हे सदरची मिळकत कायम खरेदी घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदारांचे नांव | गट क्रं. उपविभाग क्रं. | क्षेत्र चार.चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|
| १) श्री.बद्रेआलम इस्लामखान<br>२) श्री.सोपन कडू चौधरी<br>३) श्री.दाऊद एम.यासिन पटेल | ८२/३ | ०-१३-९०<br>पो.ख.०-००-००<br>०-१३-९० | ०.७२ |
| | वरील एकूण क्षेत्रापैकी मालक / कब्जेदारांचे यांच्या नावे असलेली ०-०५-९० गुंठे क्षेत्र खरेदी घेण्याबाबत | | |

सदर मिळकत निर्वेध असल्याची वर नमूद विद्यमान मालकांनी दिली आहे. तरी वरील मिळकतीबाबत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीस, दावा वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२४/१२/२०२१

**सही/-**
**एन.ए.शेख**
**वकील व नोटरी**
**शॉप नं.२४, अमन सोसायटी,**
**सेक्टर ५ ई, कळंबोली, नवी मुंबई**
**मो.नं.९९२०९९६९०९**

मा.पांडे साहेब यांचे कोर्टात

अर्जदाराचे वकील
ॲड.आनंद केदारी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.पनवेल यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.१३८१/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२९/०१/२०२२

सौ.रफत इमरान खान — अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत वहाळ — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार यांची मुलगी अलफिया इमरान खान हिचा जन्म दि.१८/०९/२०१७ रोजी एकविरा हॉस्पिटल श्री.अमेय कृपा, प्लॉट नं.६०, सेक्टर १९, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे. अर्जदार यांची मुलगी अलफिया इमरान खान यांचे जन्माची नोंद संबंधित ग्रामपंचायत वहाळ कार्यालयात करण्याचे राहून गेले आहे. सबब, अर्जदार यांनी आपले दि.१८/०९/२०१७ रोजीचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदणी कायदा अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे संबंधित जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी यांना उशिरा नोंद करून मिळणेबाबत आदेश होणेकरिता मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. पनवेल यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू अर्जदार यांची मुलगी अलफिया इमरान खान हिचा जन्म कधी? कुठे? झाला आहे हे कोणास समजविण्याचे असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालचे तारखेपासून एक महिन्याचे आत मे.न्यायालयात स्वतः अथवा त्यांचे वकील किंवा कायदेशीर प्रतिनिधी मार्फत हजर राहून आपल्या हरकती नोंदवाव्यात. या जाहीर नोटीसीने असेही कळविण्यात येते की, जर सदरहू १ महिन्याचे मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू मे.न्यायालय सदरहू अर्जदार यांचेकडून लागलीच पुरावा घेवून त्यांचे जन्माची उशिरा नोंदणी करण्याचे आदेश देईल.

आज दि.२८/१२/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

अर्जदार तर्फे वकील : अनंत देवजी पाटील

### जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण सो.रायगड यांचे कोर्टात
मो.अप.क्लेम नं.३३/२०१८
नि.नं.१९/ड
ने.ता.०५/०१/२०२२

सुखेद्रसिंह छोटकाऊसिंह रघुवंशी वगैरे १ — अर्जदार
विरुद्ध
१) बबन गेनुभाऊ दणगट
२) बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्स कं.लि. — सामनेवाला
प्रति,
सामनेवाला नं. १) बबन गेनुभाऊ दणगट
रा.बी-५०३, ५ वा मजला,
स्टील चेंबर, कळंबोली, पनवेल,
जि.ठाणे ४००६०१

दि.०३/०१/२०१८ रोजी सकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास मौजे : सावरोली गावाच्या हद्दीत भूषण स्टील कंपनी समोरील इसाबाफाटा ते सावरोली जाणाऱ्या रस्त्यालगत व्ही.विनायक घोसाळकर यांचे दुकानाचे समोर रस्त्यापासून सुमारे १० फुट अंतरावर खालापूर पोलीस ठाणे, ता.खालापूर, जि.रायगड यांच्या हद्दीत अपघात घडला.

सदर अपघातामध्ये ट्रेलर क्र.एमएच-०६/अेसी ६३१४ वरील चालक महाभारतसिंह सुखेंद्रसिंह रघुवंशी यांच्या मरणास कारणीभूत ठरले आहेत. म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेकरिता अंदाजे रु.१५,००,०००/- ची नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हास जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दि.०५/०१/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयात सादर करावा. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख १४/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **जि.न्याया, रायगड-अलिबाग** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **अधिक्षक (न्याय विभाग)** **जि.न्याया, रायगड-अलिबाग**

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.२१२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२७/०१/२०२२

१) सौ.नीता लिलेश्वर ठाकूर
वय : ३७ वर्षे, धंदा : गृहिणी
२) सो.ज्योत्स्ना राकेश घरत
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
दोघीही रा.भेंडखळ, पो.जे.एन.पी.टी.,
ता.उरण, जि.रायगड ४००७०२ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१) अर्जदार हे वरील पत्यावरील कायमचे रहिवासी असून, अर्जदारांचे वडील कै.मोतीराम सोमाजी भोईर हे त्यांच्या कुटुंबासमवेत मौजे : भेंडखळ, पो.जे.एन.पी.टी., ता.उरण, जि.रायगड येथे राहत होते. त्यांचे दि.२४/१२/२०२० रोजी राहत्या घरी निधन झाले. त्याप्रमाणे त्यांच्या मृत्यूची नोंद सरकारी दप्तरी झालेली आहे. तसेच पत्नी कै.नलिनी मोतीराम भोईर यांचे दि.१३/०८/२०२१ रोजी राहत्या घरी भेंडखळ येथे निधन झाले आहे. तसेच त्यांची आई आयतुबाई सोमाजी भोईर यांचे बऱ्याच वर्षापूर्वी राहत्या घरी निधन झाले आहे. अर्जदार ह्या कै.मोतीराम सोमाजी भोईर यांचे कायदेशीर वारस असून अर्जदारांशिवाय कै.मोतीराम सोमाजी भोईर यांना अन्य कोणीही वारसदार नाहीत.

२) अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कार्यालयीन कामाकरिता वारसदाखल्याची आवश्यकता आहे. त्या कारणास्तव अर्जदार ह्या कै.मोतीराम सोमाजी भोईर यांचे कायदेशीर वारस आहेत, असे जाहीर करून तसा वारसदाखला मिळणेकरिता सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल करीत आहेत.

तरी याबाबत कोणाला काही हरकत घेण्याची असेल तर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आत मे.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) उरण यांचे कोर्टात हजर व्हावे. अन्यथा कोणाचीही हरकत नाही असे गृहीत धरुन अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला देण्यात येईल.

आज दि.१८/१२/२०२१ रोजी माझे सहीने आणि मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्याया, उरण** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्याया, उरण**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.शशिकांत दत्ताराम चिखलीकर, श्री.संजय शशिकांत चिखलीकर, श्री.विजय शशिकांत चिखलीकर आणि श्रीमती.विदिता शशिकांत चिखलीकर हे मयत श्रीमती.शीला शशिकांत चिखलीकर यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत श्रीमती.शीला शशिकांत चिखलीकर यांचे नांवे सदनिका क्र. सी-६/१४/०:१ तळमजला, प्लॉट क्र.१२, सी-६ टाईप अपार्टमेंट असोसिएशन, सेक्टर-१८, नवीन पनवेल (पूर्व), ता.पनवेल, जिल्हा : रायगड-४१०२०६ एकूण ४२.६२ चौरस मीटर चटई क्षेत्रफळाची आहे. सदर सदनिका यापूर्वीचे एक खरेदीदार श्री.विनायक शंकर रिजबुड यांचेकडून या सदनिके संदर्भात सदनिकेचे मुळ वाटप पत्र, सिडकोला पैसे दिलेल्या पावत्या, लीज डीड ची मुळ प्रत व त्याची नोंदणी पावती, श्री.विनायक शंकर रिजबुड यांचे नावाने सिडकोने दिलेली फायनल ऑर्डरची मुळ प्रत व इतर काही कागदपत्रे हरविली होती त्या संदर्भात श्री.विनायक शंकर रिजबुड यांनी शहर पोलीस स्टेशन, पनवेल यांचेकडे दि.१०/०१/१९९२ रोजी रितसर तक्रार मिसिंग रजिस्टर १/१९९२ मध्ये केली होती व त्याची दखल घेवून चौकशी करून शहर पोलीस स्टेशन, पनवेल यांनी श्री.विनायक शंकर रिजबुड यांना दि.२१/०१/१९९२ रोजी हरविलेली कागदपत्रे मिळाली नसल्याचा दाखला दिला होता. त्यानुसार श्री.विनायक शंकर रिजबुड यांनी सदर हरविलेल्या कागदपत्रांची दुय्यम साक्षांकित प्रती संबंधित कार्यालयांकडून प्राप्त केल्या आहेत. सदर सदनिका माझे अशिल श्री.शशिकांत दत्ताराम चिखलीकर, श्री.संजय शशिकांत चिखलीकर, श्री.विजय शशिकांत चिखलीकर आणि श्रीमती.विदिता शशिकांत चिखलीकर हे श्रीमती.रेखा अनिल जोशी व अनिल मधुकर जोशी यांना विक्री करीत आहेत. वरील गहाळ झालेली कागदपत्रे जर कुणाकडे असतील तर त्यांनी ती खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे वा समक्ष येवून भेटावे.

वरील सदनिकेवर वा त्यापैकी कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त तारण, साठेकरार, समजोता करार वा तत्सम कोणतेही स्वरुपाचा दावा, वाद वा मालकी किंवा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे वा समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न झाल्यास सदर सदनिका / मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. सदरहू मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२८/१२/२०२१

**सही/-**
**ॲड.संदीप डोंगळे**
**२४, जनता बाजार, सुर्या हॉटेल समोर, रोड क्रमांक ४, सेक्टर १८, नवीन पनवेल (पूर्व)-४१०२०६**

# संक्षिप्त...

## रोहा देवकान्हे येथील मोफत अस्थिरोग तपासणीला रुग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

रोहा तालुक्यातील देवकान्हे येथे लायन्सक्लब ऑफ कोलाड रोहा आणि दीपक फाऊंडेशन रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच ग्रुप ग्राम पंचायत देवकान्हे यांच्या सहकार्याने डॉ.नमिता दिघे, डॉ.प्रशांत गोसावी, डॉ.स्नेहल शेलार, डॉ. विनोद गांधी, आशा तज्ञांमार्फत अस्थिरोग रुग्णांना प्राथमिक तपासणी तसेच त्यांना मोफत औषधोपचार करण्यात आले.

यावेळी लायन्सक्लब ऑफ कोलाड रोहा चे उपाध्यक्ष डॉ.मंगेश सानप, दीपक फाऊंडेशन अजय आवाडे, देवकान्हे ग्राम पंचायत चे उपसरपंच सूरज कचरे, सदस्य दयाराम भोईर, शाळेचे मुख्याध्यापक टिकुळे, लायन्सक्लब कोलाडचे सेक्रेटरी रविंद्र लोखंडे, खजिनदार डॉ श्यामभाऊ लोखंडे, बोर्ड ऑफ डायरेक्टर अनिल महाडिक, लायन महेश तुपकर,राजेंदर कोप्पू,विश्वास निकम, सौ पूजा लोखंडे, दीपक फाऊंडेशनचे सहकारी अश्विनी ऐत, अक्षरा जाधव, नाजुका चौलकर, मारुती निगडे, मल्लेश हंचली, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विश्वास थिटे, आशा ताई, अंगणवाडी सेविका सह आदी मान्यवर व ग्रामस्थ महिला वर्ग उपस्थित होते.

प्रसंगी यावेळी फिजिओथेरपीष्ट तज्ञ डॉ स्नेहल शेलार यांनी उपस्थित रुग्णांना संधीवात मणक्याचे आजार यावर योगा द्वारे प्रात्यक्षिका करत सखोल मार्गदर्शन केले तसेच ऑर्थोपेडीक तज्ञ डॉ गोसावी यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की सर्वांनी आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे आहारात नेहमी पाले भाज्या व संक्रमित अन्यपदार्थ खावेत पाणी भरपूर प्यावे इतर कामांच्या व्यापाबरोबरच आरामाकडे देखील तेवढेच लक्ष केंद्रित करावे असा मोलाचा सल्ला दिला. दीपक फाऊंडेशन आणि लायन्सक्लब ऑफ कोलाड रोहा यांनी दुर्गम आणि ग्रामीण भागात आयोजित केलेल्या अस्थिरोग तपासणीत १५० हुन अधिक रुग्णांची तपासणी करत त्यांना मोफत औषधोपचार करण्यात आले.

# नेरळ रेल्वे स्थानकात स्कायवॉक होण्यासाठी खासदारांकडे केली मागणी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

नेरळ रेल्वे स्थानकातून थेट वाहनतळापर्यंत किंवा मुख्य रस्त्यापर्यंत जाण्यासाठी कोणतीही व्यवस्था नाही.त्यामुळे रेल्वे विभागाने नेरळ स्थानकाच्या विकास आराखड्यात स्कायवॉकचा अंतर्भाव करण्यात यावा या मागणीसाठी खासदार श्रीरंग बारणे यांना निवेदन देण्यात आले. नेरळ रेल्वे स्थानकाच्या बाहेर रस्त्यावर असलेल्या गर्दीतून मार्ग काढीत जाण्यापेक्षा छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि मिनीट्रेनचे पाडा येथील गेट येथे उतरणारा स्कायवॉक बांधण्यात यावा अशी मागणी नेरळकरांचे वतीने करण्यात आली.



वाढते नागरीकरण लक्षात घेता नेरळ रेल्वे स्थानकातुन उपनगरीय लोकल मधून प्रवास करणारे यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे नेरळ स्टेशन बाहेर असलेल्या रस्त्यावर असलेली वाहनांची गर्दी यातुन वाट काढताना अनेकांची लोकल चुकते. त्यानंतर संध्याकाळी लोकल मधून कामावरून येणारे नेरळकर यांना देखील स्टेशन समोर असलेली वाहनांची वर्दळ यामुळे रस्त्यातून चालताना देखील त्रास होतो. त्यामुळे नेरळ रेल्वे स्थानकातून गर्दीच्या बाहेर थेट रेल्वे स्थानकातून कोणतीही व्यवस्था नाही. त्यामुळे नेरळ स्थानकातून बाहेर जाण्यासाठी रेल्वेने नेरळ रेल्वे स्थानकाच्या विकास आराखड्यात स्कायवॉक बांधव अशी मागणी नेरळ ग्रामपंचायतचे माजी सरपंच आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कर्जत तालुका अध्यक्ष भगवान चंचे यांनी मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांची पनवेल येथील कार्यलयात भेट घेऊन निवेदन देऊन केली. त्यावेळी नेरळ ग्रामपंचायतचे सदस्य,राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे नेरळ अध्यक्ष अतुल चंचे, राष्ट्रवादीचे नेरळ मधील जेष्ठ कार्यकर्ते विश्वनाथ जामघरे उपस्थित होते. राष्ट्रवादीचे पदाधिकारी खासदार बारणे यांच्या कार्यालयात आले त्यावेळी तेथे नेरळ शिवसेनेचे माजी उपशहरप्रमुख बंडू क्षीरसागर आणि भिवपुरी रोड रेल्वे स्थानक प्रवासी संघटनेचे अध्यक्ष किशोर गायकवाड हे देखील त्यांच्या कामासाठी हजर होते.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे यांनी आम्ही नेरळ रेल्वे स्थानकाचा कायापालट करण्याचा आरखडा तयार करीत आहोत. रेल्वे कडून आतापर्यंत आराखडा तयार होत असून नेरळ स्थानकात कर्जत एन्डकडे पादचारी पूल बनविला जाणार आहे तसे नियोजन झाले असून हा पादचारी पूल स्थानिकांची मागणी लक्षात घेऊन गावात उतरविण्याची मागणी वाढत आहे. यापूर्वी काही संस्था आणि पक्षांनी हि मागणी केली आहे.

त्यामुळे हा पादचारी पूल नेरळ–माथेरान रस्त्यावरील छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या बाजूला असलेल्या रेल्वेच्या पार्किंग मध्ये उतरवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. परंतु आताची मागणी लक्षात घेता रेल्वे प्रवासी यांना बाजारपेठेतील पर्याय शिवाय पाडा गेट येथील रेल्वेच्या जागेत उतरविण्याचा पर्याय देखील योग्य आहे. भगवान चंचे यांनी केलेली मागणी लक्षात घेता मिनीट्रेनच्या मार्गिकेवरून स्कायवॉक थेट मिनीट्रेनच्या पाडा गेट येथे रेल्वेच्या जागेत उतरविण्याचा पर्याय देखील व्यावहारिक दृष्ट्या चांगला आहे. त्यामुळे जानेवारी महिन्यात पहिल्या आठवड्यात मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक यांच्याकडे होणाऱ्या बैठकीत स्कायवॉक च्या दुसऱ्या पर्यायाला अंतिम स्वरूप देण्यात येईल असे आश्वसन खासदार श्रीरंग बारणे यांनी यावेळी नेरळकरांना दिले.

दरम्यान, नेरळ येथील प्रस्तावित स्कायवॉक बद्दल खासदार बारणे यांनी केलेल्या नेरळ स्थानकाच्या विकास आराखड्यात समावेश केला आहे.त्यामुळे नेरळकर रेल्वे प्रवासी यांची स्थानकाच्या बाहेरील अरुंद रस्त्यावरील वाहनांच्या गर्दीतून मुक्तता होऊ शकते. त्याचवेळी नेरळ पाडा भागात नव्याने होत असलेल्या नागरीकरण याला देखील पाडा गेट येथे स्कायवॉक उतरवल्यास त्याचा फायदा या भागातील स्थानिकांना देखील होऊ शकतो. तर बुऱ्हाणी पार्क आणि पेट्रोल पंप या परिसरात नव्याने नागरीकरण सुरु झाले असून त्या भागासाठी हा मार्ग फायद्याचा ठरू शकतो.

# १९७१ भारत - पाक युद्ध विजय दिवसाचा सुवर्ण महोत्सव खोपोलीत साजरा



**दै.रायगड नगरी । खोपोली**

१९७१ भारत – पाक युद्ध विजय दिवसाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त आज रविवार दि. २६ डिसेंबर २०२१ रोजी खोपोली येथे कर्जत, खालापूर, सुधागड, पेण तालुक्यातील माजी सैनिकांची संघटना असलेल्या माजी सैनिक सेवा संघटनेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खोपोली नगर परिषद खा. श्रीरंग आप्पा बारणे, नगराध्यक्षा सुमनताई औसरमल, नगरसेविका सामाजिक कार्यकर्ते आतिक खोत, जेष्ठ पत्रकार पहिलवान हनुमंतराव ओव्हाळ तसेच माजी सैनिक सेवा संघटनेचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमानिमित्ताने विविध पुरस्कारांचे वाटप व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

माजी सैनिक सेवा संघटनेच्या वतीने १९७१ भारत पाक युद्ध विजय दिवसाचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यात आला यावेळी कराटे चॅम्पियन शीतलताई गायकवाड यांना देखील सन्मानित करण्यात आले.

# अनुसया वृद्धाश्रमात ब्लँकेट वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लायन्स क्लब पनवेल रत्नाच्या वतीने मोरबे जवळील अनुसया वृद्धाश्रम आधारघर येथे ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.




यावेळी लायन्स क्लब पनवेल रत्नाचे महेश किनरे सचिव, आर्या वनौषधी संस्थेचे शशिकांत म्हात्रे,अनिल भालेराव, आर्या प्रहरचे संपादक सुधीर पाटील, पुष्पा तातरे आदी मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रम सामाजिक बांधिलकीतून करण्यात आल्याचे यावेळी लायन्स क्लब ऑफ पनवेल रत्नाचे महेश किनरे यांनी यावेळी सांगितले.

# स्वच्छता विषयक कर्मचाऱ्यांची गैरसोय दूर होणार ; हजेरी बुथ करीता कंटेनर केबिन खरेदी करणार

## शिवसेना महानगर प्रमुख रामदास शेवाळेंच्या मागणीची मनपाकडून दखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात काम करणाऱ्या स्वच्छता विषयक कर्मचाऱ्यांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. त्यांना हजेरीसाठी त्याचबरोबर निवारा म्हणून या व्यतिरिक्त सार्वजनिक स्वच्छतागृहांची सुविधा मिळत नाही. याबाबत शिवसेनेचे पनवेल महानगर प्रमुख रामदास शेवाळे यांनी महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांना पत्र देऊन कामगारांना या सुविधा पुरवण्याबाबत मागणी केली होती. त्यानुसार मनपा विविध ठिकाणी कंटेनर केबिन खरेदी करणार आहे. महा सभेसमोर हा ठराव मांडण्यात येणार आहे.



पनवेल मनपा हद्दीत एकूण वीस प्रभाग आहेत. प्रभागानुसार एकूण २० स्वच्छता निरीक्षक आणि चार आरोग्य निरीक्षक कार्यरत आहेत. पनवेल मनपाकडे कायम आणि कंत्राटी असे सुमारे १७२३ स्वच्छता विषयक कर्मचारी काम करतात. मात्र त्यांना हजेरी व प्रसाधनासाठी कोणतीही सोय प्रभागांमध्ये उपलब्ध नाही. याबाबत कर्मचारी व संघटना यांच्याकडून वारंवार मागणी होत होती. स्वच्छता दुतांच्या या गैरसोय बाबत शिवसेनेचे पनवेल महानगर प्रमुख रामदास शेवाळे यांनी महापालिका आयुक्तांना पत्र दिले होते. त्यानुसार प्रशासनाने ठिक ठिकाणी कंटेनर केबिन बसवण्याचा निर्णय घेतला आहे. महासभेसमोर ठराव सुद्धा मांडण्यात येणार आहे. विषय पत्रिकेमध्ये हा विषय घेण्यात आला असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. प्रभागातील सरासरी ५० ते १०० सफाई कर्मचाऱ्यांची दैनंदिन हजेरी घेण्याची सोय करण्यात येणार आहे. त्याचबरोबर त्यांना शौचालय, मुतारी व निवाऱ्याची सोय उपलब्ध करून देणार आहे. त्यांना त्यांचे साहित्य सुद्धा त्या ठिकाणी ठेवण्याची व्यवस्था करण्यात येईल. याव्यतिरिक्त स्वच्छता निरीक्षकांना त्या प्रभागात बसण्याची सोय केली जाणार आहे. जेणेकरून त्यांचा जनसंपर्क वाढून नागरिकांच्या तक्रारींचे निवारण लवकरात लवकर होईल. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात अशाप्रकारे एकूण १८ केबिन बसवण्याचा प्रस्ताव आहे. त्यासाठी एक कोटी ४० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. या प्रस्तावास सर्वसाधारण सभेस मंजुरी देण्याच्या अनुषंगाने विषय ठेवण्यात आला आहे. पनवेल महानगरपालिका प्रशासनाने सहानभूती पूर्वक विचार करून स्वच्छता विषयक कर्मचाऱ्यांना ही सुविधा निर्माण करून देण्याच्या अनुषंगाने जो पुढाकार घेतला याबाबत रामदास शेवाळे यांनी समाधान व्यक्त केले आहे. याशिवाय नियमाप्रमाणे इतर सोयीसुविधा त्यांना पुरविण्यात याव्यात अशा प्रकारची न्याय मागणी पुन्हा एकदा शेवाळे यांनी केले आहे.

# नवघर हद्दीतील विविध विकासकामांचे मनोहर भोईर यांच्या हस्ते उद्घाटन व भूमिपूजन



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील ग्रामपंचायत नवघर येथे नवघर कमान ते भेंडखळ फाटा रस्ता डांबरीकरण करणे, नावघरपाडा येथे पाण्याची पाईपलाईन टाकणे, नवघरपाडा येथे प्रवेशद्वार कमान बांधणे सदरील कामे ही जिल्हापरिषद सेस फंड, जिल्हापरिषद १५वा वित्त आयोग आणि ग्रामपंचायत १४ वा वित्त आयोग या निधींअंतर्गत मंजूर केली होती. स्वागत कमानीचे काम पूर्ण झाले असून त्याचे उद्घाटन व पाण्याची लाईन व रस्त्याच्य कामाचे भूमीपूजन शिवसेना जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर व काँगेस जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात पार पडले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य विजय भोइर, माजी सरपंच दौलत शेठ घरत, माजी उपसभापती महादेव बंडा, सरपंच आरती चौगुले, उपसरपंच रवीशेठ वाजेकर, शेकाप नेते मनोहर बंडा, ग्रामसेवक किरण केनी , शाखाप्रमुख नवघर अविनाश म्हात्रे, शाखाप्रमुख नवघर पाडा विलास जोशी, मनोज पाटील, युवासेना नवघर विभाग प्रमुख चेतन पाटील, उपशाखाप्रमुख विशाल डाके, टेम्पो युनियन अध्यक्ष रवी पाटील, संतोष पाटील, माजी उपसरपंच हितेश भोइर, सुरेश बंडा,सुमती बंडा, जयवंत बंडा, मुकुंद बंडा, प्रशांत बंडा, अतिश बंडा, परेश पाटील, प्रमोद पाटील, दिनेश बंडा, विनोद बंडा, मिलिंद बंडा, किशोर बंडा, महेश पाटील, विनायक बंडा, संदेश भोईर, तसेच शिवसैनिक, शेकाप व काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# कालवा सफाईचे अग्निदिव्य, बरीच घाण-कचरा, झाड-झुडपे माजलीत

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**



माणगांवकरांचा लक्षवेधी कालवा आणि त्याची चालू झाली सफाई. महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाच्या आधुनिक कोबेल्को मशिनचा वापर करुन हे काम आता डिसेंबरच्या शेवटाला सुरु झाले आहे. कालव्याचे गटार झाले असुन मोठ्या प्रमाणात प्लास्टीक कचरा, काच बाटल्या, हारतुरे घरातील घाण कपडे यामध्ये फेकण्यात आली आहे. तसच या कालव्यात दूतर्फा अनावश्यक रान माजले आहे. दाटीवाटीने वाढलेल्या झाड–झुडपांची मुळ खोलवर बंधाऱ्यात वेडि–वाकडी शिरली आहेत. वेलींनी आपला पसारा त्यावर आच्छादला असुन सफाईचे हे अग्निदिव्य काम कसे उरकणार ? असे प्रश्नचिन्हच आहे. कि घाईगडबडीत हे काम एकदाचे उरकणार.

आणखी विशेष म्हणजे अनेक जागी कालवा बंधारे गळतीची समस्या आवासून आहेच. पूर्वी कालव्याची सफाई, काळ प्रकल्पाचे कामगार करीत, आधुनिक मशनरीचा वापर होत नव्हता, तरी सुध्दा वर्षभर टाटटीप, निटनेटकी सफाई व्हायची. माणगांवचा कालवा शहराचे सौंदर्यात भर टाकायचा, आता एवढी आधुनिकतेची जोड असुन सुध्दा ओरबाडल्या प्रमाणे सफाई होते. याचे आश्चर्य व्यक्त होत आहे. डिसेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्याच्या सुरुवातीलाच कालव्याला पाणी यायचे, वातावरणात गारवा व परिसरात हिरवाई नटायची. यंदा थोडासा विलंब झाला आहे. पण आता सफाई सुरु झाल्याने कालवा लवकरच सुरु होणार अशी चिन्ह दिसत आहेत.

# श्री सोमजाई देवी रथोत्सवास हजारो भक्तांची मांदियाळी

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धनची ग्रामदेवता आई सोमजाई देवीच्या रथोत्सवातील मुखदर्शनासाठी हजारो भाविकांचा महासागर लोटला होता.

मार्गशीर्ष कृष्ण पक्षात २० डिसेंबर रोजी देवीच्या सप्ताहास प्रारंभ झाला होता. वर्षानुवर्षे चालत आलेली परंपरा श्रीवर्धन मध्ये अजूनही जशीच्या तशी जोपासली जाते. सप्ताहाच्या सात दिवस रात्रंदिवस भजन करून देवीचा जागर करण्यात आला. कसबा भंडारी समाज, वाणी समाज, नवीपेठ भंडारी समाज, भट्टीचामाळ कुंभार समाज व सोनार समाज व श्रीवर्धनमधील भाविक आळी पाळीने दोन दोन तास भजनसेवा करत असतात. या सप्ताहाच्या सात दिवसात मृदुगाची थाप टाळ्यांचा व टाळाचा गजर एक सेकंदही थांबवला जात नाही.



कोरोनामुळे गतवर्षी महाप्रसादाचा शेकडो वर्षाच्या परंपरेला खंड पडला होता. यंदा कोरोनाच्या सर्व नियम व अटींचे काटेकोर पालन करून दिनांक २७ डिसेंबर रोजी महाप्रसाद झाला. यावेळी देखील तालुक्यातील हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. महाप्रसादाच्या दिवशी रात्री १२ वाजता आई सोमजाई देवी रथामध्ये विराजमान झाली.

यंदा आई सोमजाई देवीचा आकर्षक असा नवीन रथ एक भाविकांने दिल्यामुळे नवीन रथात विराजमान आईच दर्शन घेण्याची उत्सुकता निर्माण झाली होती. आईच्या पहिल्या मुखदर्शनासाठी रात्री १२ वाजता भक्तांची महासागर पसरला होता. रात्री १२ वाजता निघालेला रथ छत्रपती शिवाजी चौक, संत रोहिदास नगर, सोमजाई नगर, मेटकर्णी नवी पेठ बाजार पेठ पूल, ते कसबा मार्गे गणपती मंदिर असा मार्गक्रमण सोमजाई मंदिरात उत्सवाची दुपारी ३:३० वाजता सांगता झाली.